रासनिप्रा

# राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
# महाराष्ट्र राज्य, पुणे.

**जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, ५ बी. जे. रोड, पुणे – ४११००१.**
**फोन नं. -** (०२०) २६०५०६४१ **ई मेल आयडी** -sceapune@gmail.com

**निवडणूक महत्वाचे** जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-११/निवडणूक सुरू करणे/१२९४/सन २०२३.
दिनांक१५/०२/२०२३.

**प्रति,**

मा. संचालक (माहिती) (वृत्त व जनसंपर्क)
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-३२

**विषय :- प्रेसनोट सादर करणेबाबत...**

**संदर्भ :-** या प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. रासनिप्रा/कक्ष-११/निवडणूक सुरु करणे/आदेश/१२७६/ सन २०२३ दिनांक १५.०२.२०२३.

आपले लक्ष संदर्भीय विषयाकडे वेधण्यात येत आहे.

२/- उपरोक्त संदर्भीय आदेशान्वये प्राधिकरणाने दिनांक ०१.०४.२०२१ ते दिनांक ३१.१२.२०२२ या कालावधीतील निवडणूकीस पात्र सर्व प्रकारच्या सहकारी संस्था (कृषि पतसंस्था व बहुउद्देशीय सहकारी संस्था वगळता) यांच्या निवडणूक प्रक्रिया दिनांक ०१.०३.२०२३ पासून सुरू केलेल्या आहेत.

३/- सदर बाबीची प्रेसनोट या पत्रासोबत जोडून पाठविण्यात येत आहे. तरी सदर बाबीस संपूर्ण राज्यात व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी ही विनंती.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मान्यतेने.**

सोबत :- प्रेसनोट दिनांक १५.०२.२०२३

**(डॉ. पी. एल. खंडागळे)**
सचिव,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रेसनोट**

१. कोव्हीड-१९ व इतर नैसर्गिक आपत्तींमुळे प्रलंबित राहीलेल्या सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांच्या निवडणूका पूर्व पदावर आणण्यासाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने दिनांक १५.०२.२०२३ रोजीच्या आदेशानुसार दिनांक ०१.०४.२०२१ ते दिनांक ३१.१२.२०२२ या कालावधीतील निवडणूकीस पात्र सर्व प्रकारच्या सहकारी संस्था (कृषि पतसंस्था व बहुउद्देशीय सहकारी संस्था वगळता) यांच्या निवडणूक प्रक्रिया दिनांक ०१.०३.२०२३ पासून सुरू करणेबाबत जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांना आदेश दिलेले आहेत.

२. सदर संस्थांच्या निवडणूकांसाठी दिनांक ०१.०२.२०२३ या अर्हता दिनांकावर प्रारूप मतदार यादया तयार करावयाच्या आहेत.

३. त्याचप्रमाणे प्राधिकरणाने सन २०२३ मधील दिनांक ०१.०१.२०२३ ते दिनांक ३१.१२.२०२३ या कालावधीतील निवडणूकीस पात्र अ, ब, क व ड वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया संचालक मंडळाची मुदत संपण्यापूर्वी अनुक्रमे १५०, १२०, ६० व ६० दिवस अगोदर सुरु करणेबाबत जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांना आदेश दिलेले आहेत.

४. सदर संस्थांच्या निवडणूकांसाठी संचालक मंडळाची मुदत संपल्याच्या दिनांकावर प्रारूप मतदार यादया तयार करावयाच्या आहेत.

५. ज्या सहकारी संस्था निवडणुकीकरीता प्रारुप मतदार यादी सादर करणार नाहीत किंवा पुरेसा निवडणूक निधी उपलब्ध करणार नाहीत अशा संस्थांवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, नियम १९६१ व महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ अंतर्गत कारवाई करणेबाबत जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांना आदेश दिलेले आहेत.

६. सदरच्या आदेशानुसार अ, ब, क व ड वर्गातील अनुक्रमे ६३, १०१४, १०१६३ व ९३९८ अशा एकूण २०,६३८ सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया सुरु केलेल्या आहेत.

७. अ वर्ग संस्थांमध्ये प्रामुख्याने २८ सहकारी साखर कारखाने, ३ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, २६ सहकारी सुतगिरण्यांचा समावेश आहे.

८. सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया पार पाडण्याकरीता आवश्यकतेनुसार शासनाच्या इतर विभागातील समकक्ष अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणेबाबत जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांना आदेश दिलेले आहेत.

(डॉ. पी. एल. खंडागळे)
सचिव,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे